MHRT010007422021

| | |
|---|---|
| सरकार तर्फे संजय मनोहर भालेकर | फिर्यादी |
| *विरुद्ध* | |
| सुरेंद्र शशिकांत सावंत | आरोपी |

## सत्र खटला क्रमांक ५३/२०२१ मधील नि. १२ वरील आदेश

१. आरोपी (अर्जदार) विरुध्द प्रस्तुत खटला भा.द.वि.सं. ३५३,३३२,५०४,५०६ या कलमांअंतर्गत गुन्हयांसाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द असा आरोप आहे की, फिर्यादी हे रत्नागिरी जिल्हयातील मध्यवर्ती बँकेत वसुली अधिकारी म्हणून कर्तव्य बजावत असतात, फिर्यादीने आरोपी थकीत कर्जदार याला कर्जाची रक्कम भरण्याबाबत मोबाईलवर संपर्क साधला असता आरोपीने त्याला घटनास्थळी बोलावून मारहाण केली.

२. प्रस्तुत अर्जाद्वारे आरोपीने अशी विनंती केली आहे की, त्याच्याविरुध्द दोषारोप निश्चित करण्यापूर्वी त्याची मुक्तता करावी कारण की, फिर्यादी हा भा.द.वि. चे कलम २१ प्रमाणे लोकसेवक या व्याख्येत बसत नाही. आरोपीविरुध्द लावलेली कलमे लागू होत नाहीत. आरोपीला खोटेपणाने राजकीय दबावाखाली प्रस्तुत

प्रकरणात अडकविण्यात आलेले आहे.

३. आरोपी/अर्जदार यांचे वकील श्री. एस.एन.कांबळे यांचे युक्तीवादा प्रमाणे त्यांनी 'State of Maharashtra And Etc. Vs. Laljit Tejshi Shah and others, 1994(1) MhLj 452' या निकालपत्राचा आधार घेतला. त्या प्रकरणात आरोपी हे एका सहकारी संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य होते. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदयाचे कलम १६१ नुसार ते भा.द.वि.च्या कलम २१ प्रमाणे लोकसेवक होते असा न्यायनिवाडा मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिला.

४. याउलट अतिरीक्त अभियोक्ता श्री.पी.आर.साळवी यांनी फिर्यादी हा भा.द.वि. च्या कलम २१(१२) प्रमाणे लोक सेवक असल्याचे सांगितले. जिल्हा सहकारी बँकेचे कार्य शासकीय विधी द्वारे चालते. फिर्यादी हा वसुली अधिकारी म्हणून त्याच्या कर्तव्याचे निर्वहन करताना प्रस्तुत घटना घडलेली आहे.

५. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यावर असे दिसते की, अर्जदार भा.द.वि. कलम २१(१२) प्रमाणे लोकसेवकाच्या व्याख्येत बसतो. अर्जदाराच्या वतीने दाखल न्यायनिवाडयात तथ्ये वेगळी होती. त्यामुळे त्या न्यायनिवाडयाचा उपयोग अर्जदाराला/आरोपीला होवू शकणार नाही. अर्जदाराविरुध्द लावलेली कलमे आकर्षीत होण्याकरीता पुरेसा पुरावा न्यायालयापुढे आहे. अर्जदाराला दोषारोपापूर्वी

मुक्त करण्याचे अन्य कोणतेही कारण दिसत नाही. करीता खालील आदेश.

**<u>आ दे श</u>**

अर्ज नि. क्र. १२ नामंजूर करण्यात येतो.

VINAYAK RAJARAM JOSHI

Digitally signed by VINAYAK RAJARAM JOSHI
Date: 2023.09.08 16:46:59 +0530

रत्नागिरी. ( व्ही.आर.जोशी )

दिनांकः- ०८/०९/२०२३ सत्र न्यायाधीश, रत्नागिरी.

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Sessions Case No. | :- | 53/2021. (O. Exh. 1) |
| Name of Stenographer | :- | Smt.N.N.Desai |
| Court Name | :- | District Court, Ratnagiri. |
| Date of Decision | :- | 08.09.2023 |
| Order signed by P.O. on | :- | 08.09.2023 |
| Order uploaded on | :- | 08.09.2023 |